14 OCT 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सांगलीतील निवासस्थानी भेट : ग्रंथभेट देऊन विद्यापीठातर्फे सत्कार

# तारा भवाळकर प्रागतिक स्त्रीवादी संशोधक, साहित्यिक : शिर्के

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मराठी भाषेला अभिजात दर्जा घोषित झाला असतानाच डॉ. तारा भवाळकर यांच्यासारख्या प्रागतिक स्त्रीवादी संशोधक-साहित्यिकेची नवी दिल्ली येथे नियोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होणे हा अत्यंत चांगला संकेत असल्याचे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी सांगली येथे काढले.

नवी दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक, संशोधक व समीक्षक असलेल्या डॉ. तारा भवाळकर यांची निवड झाली. त्यानिमित्ताने कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगली येथील त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि ग्रंथभेट देऊन शिवाजी विद्यापीठाच्या वतीने अभिनंदन व सत्कार केला. त्यावेळी ते बोलत होते.



नवी दिल्ली येथील नियोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांचा सांगली येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सत्कार केला. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे आदी उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, मराठी साहित्य संमेलनाच्या शतकभराच्या वाटचालीमध्ये अवघ्या सहा महिलांना अध्यक्षपद भूषविण्याची संधी मिळाली आहे. त्यामध्ये डॉ. भवाळकर यांचा समावेश झाला, ही अतीव अभिमानाची बाब आहे. नवी दिल्ली येथे यापूर्वी झालेल्या संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ तत्त्वज्ञ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भूषविले होते. त्यानंतर आता डॉ. भवाळकर या देशाच्या राजधानीमधून जगभरातील मराठी भाषिकांना आपल्या अध्यक्षीय भाषणाद्वारे संबोधित करतील, ही मराठी भाषेच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना ठरेल.

डॉ. भवाळकर म्हणाल्या, शिवाजी विद्यापीठाशी माझा खूप जुना स्नेह आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ परिवाराच्या वतीने कुलगुरूंनी केलेला गौरव हा मला माझ्या कुटुंबीयांनीच केला आहे, अशी आपली भावना असल्याची कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे आणि डॉ. अविनाश सप्रे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2024
तरुण भारत

# विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके देण्यास विद्यापीठ कटिबद्ध

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थ्यांना दर्जेदार पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असून या प्रयत्नांना सर्व अधिकार मंडळांचे, शिक्षकांचे मोठे सहकार्य लाभत आहे, असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून विद्यापीठांनी पाठ्यपुस्तके मातृभाषेत अनुवादित करून विद्यार्थ्यांना पुरवावीत, असे निर्देश शासनाने दिले.

- **कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन**

त्यामधील तांत्रिक अडचणी लक्षात आल्याने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाने विविध विषयांच्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके स्वत: निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विविध अभ्यास मंडळांनी तयार केलेल्या विद्यापीठाच्या पहिल्या पाच पाठ्यपुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी युनिव्हर्सिटी प्रेस' या नामाभिधानाखाली विद्यापीठाचे मुद्रणालय ही पुस्तके प्रकाशित करीत आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत शिवाजी विद्यापीठ राज्यात अग्रेसर असून त्यामध्ये सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्यात येत आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सागर डेळेकर, अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ. सुनील गायकवाड, डॉ. जी.बी. कोळेकर, डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. विकास मिणचेकर, पाठ्यपुस्तकांचे लेखक व संपादक डॉ. भारत नाईक, डॉ. डी. के. दळवी, डॉ. जी. एच. निकम, डॉ. अर्जुन पन्हाळे, डॉ. भारती वाली, डॉ. वर्षा कुंभार, डॉ. के.जी. पोतदार, डॉ. राहुल कश्यप, डॉ. शिरीष शितोळे, डॉ. विनायक होनमारे, डॉ. चैत्रा राजाज्ञा, डॉ. विनोद कांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2024
तरुण भारत

# नियतकालिक स्पर्धेत शाहू कॉलेजचे यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागांतर्गत घेण्यात आलेल्या नियतकालिक स्पर्धेत शाहू कॉलेजने दोन पारितोषिके पटकावली आहेत. ऋतुराज अवघडे (बी.एस्सी. भाग २) याच्या 'जंग" कवितेला व्दितीय तर सागर लोंढे (बी.ए. भाग ३) याच्या 'चित्रप्रेम" कथेला तृतीय क्रमांक मिळाला. या नियतकालिकाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एल. डी. कदम व संपादन डॉ. सिंधू आवळे यांनी केले. संपादक मंडळात डॉ. आर. सी. पाटील, डॉ. एस. एस. लवेकर, डॉ. एस. पी. पवार, प्रा. डी. डी. ढेरेंचा समावेश होता. याबद्दल त्यांचे संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य सरोज पाटील, चेअरमन संगीता पाटील यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2024
- सकाळ

# नियतकालिक स्पर्धेत 'राजर्षी शाहू'चे यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे झालेल्या नियतकालिक सपर्धेत राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाने दोन पारितोषिके पटकावली. यात ऋतुराज अवघडे (बीसीएस भाग-२) याच्या 'जंग' कवितेला द्वितीय, तर सागर लोंढे (बीए भाग-३) याच्या 'चित्रप्रेम' कथेला तृतीय क्रमांक मिळाला. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी अंकाचे अध्यक्ष, तर प्रा. डॉ. सिंधू आवळे यांनी प्रमुख संपादक म्हणून काम पाहिले. डॉ. आर. सी. पाटील, डॉ. एस. एस. लवेकर, डॉ. एस. पी. पवार, डॉ. व्ही. पी. नांगरे, प्रा. डी. ए. मालवेकर, डॉ. एम. टी. रणदिवे, डॉ. बी. बी. घुरके, प्रा. डी. डी. ढेरे यांनी विभागीय संपादक म्हणून काम पाहिले. त्यांना रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य सरोज पाटील, विकास समितीचे चेअरमन संगीता पाटील, उपप्राचार्य प्रा. पी. एस. चौगुले डॉ. ममता कन्नाडे, अधीक्षक बी. एम. शिंदे यांचे प्रोत्साहन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2024
तरूण भारत

# 'वाचन प्रेरणा दिनी होणार शिवराज्याभिषेक सोहळ्याचे वाचन'

कोल्हापूर : मंगळवार दि.१५ रोजी साजरा होणाऱ्या वाचन प्रेरणा दिनी शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या वर्णनाचे वाचन केले जाणार आहे. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व अधिविभागात एकाच वेळी वाचन होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली आहे.

शासनाच्या आदेशानुसार शिवाजी विद्यापीठाच्यावतीने दरवर्षी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येतो. यंदाच्या वर्षापासून त्याची व्याप्ती महाविद्यालयांपर्यंत वाढवून सर्व संबंधित घटकांना सामावून घेऊन वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि.१५ रोजी सकाळी १०.३० ते ११ या कालावधीत वाचन होणार असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2024
तरुण भारत

# 'शंभर पॅटर्नमध्ये अंतिम वर्षाला प्रवेश द्या'

कोल्हापूर :सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाप्रमाणे शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विधी महाविद्यालयात शंभर पॅटर्नमधील अंतिम वर्षाला प्रवेश द्या, अन्यथा शिवाजी विद्यापीठाच्या गेटवर उपोषण करणार, असा इशारा भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने निवेदनाव्दारे दिला. यावेळी कॉ. अनिल चव्हाण, वैभव पाटील, विशाखा खलाटे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 OCT 2024
पुण्यनगरी

# महिला हॉकी स्पर्धेत घाळी कॉलेजची हॅट्ट्रिक

गडहिंग्लज : प्रतिनिधी

इस्लामपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला हॉकी स्पर्धेत येथील डॉ. घाळी महाविद्यालयाने सलग तिसऱ्या वर्षी अंतिम सामन्यात जोरदार कामगिरी करत विजेतेपदाची हॅट्ट्रिक केली.

याबद्दल खेळाडूंचा डॉ. सतीश घाळी, उपाध्यक्ष अरविंद कित्तूरकर, संचालक विकास पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये स्वाती फुटाणे, मोनिका आरबोळे, अमृता जाधव, माधुरी भोसले, कृष्णा माने, साक्षी सूर्यवंशी, प्रणाली मोरे, आनुदी चव्हाण, महानंदा मास्तोळी, लता भदरगे, सानिका नगरे, वासंती वाडगोळ, स्वप्नाली आरबोळे, सारिका आरबोळे यांचा समावेश होता.

खेळाडूंना प्र. प्राचार्य दत्ता पाटील, सचिव बी. जी. भोसकी, गजेंद्र बंदी, किशोर हंजी, संगाप्पाणा दड्डी, शिवकुमार कोल्हापुरे, महेश घाळी यांचे प्रोत्साहन, तर विकास अतिग्रे, मनोहर मांगले यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त सागर बगाडे, सरोज बिडकर, ओमकार खतकल्ले, विश्वनाथ पाटील, संकेत बेल्लद, महेश वंडकर आदी उपस्थित होते.